# दिनांक 15/04/2025

1 रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/04/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे शिंदेवाडी, मोहपाडा येथून भंगार गोळा करून परत आलेवेळी खालापूर येथे 03 आरोपीत यांनी फिर्यादी रा.शिवनगर मोहपाडा खालापूर हे शिंदेवाडी, मोहपाडा येथून भंगार गोळा करून परत येत असताना आरोपीत क्रं.1 ते 3 यांनी फिर्यादी हे चोरी करण्यास आले आहे असा गैरसमज करून आरोपीत क्रं.1 यांनी फिर्यादी यांच्या डोक्यात दारुची बाटली व स्टीलची उलथन मारून दूखापत केली तसेच आरोपीत क्रं.2 याने लाकडी काठीने व आरोपीत क्र.1 ते 3 यांनी हाताबुक्कानी यांनी मारहाण करून शिवीगाळी करून एका खोलीत डांबून ठेवून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.80/2025, बी.एन.एस कलम 115(2)),118(1), 352, 351(2),127(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/पवार हे करीत आहेत.

2. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/04/2025 रोजी 12:15 वा च्या सुमारास मौजे चवदारतळे महाड येथील पुजा सहकारी सोसायटीचे पार्किंग मधील ऑफीसमध्ये ता. महाड महिला फिर्यादी यांची नात पिडीत क्र.1) अ ब क व तिची मैत्रीण पिडीत क्र. 2) अ ब क हया क्लास सुटल्यानंतर चवदारतळे महाड येथील पुजा सहकारी सोसायटीचे पार्किंग मधील ऑफीसमध्ये पिडीत क्र.01 हिची नवीन सायकल पाहण्याकरीता आल्या असता आरोपीत रा अष्टविनायक अपार्टमेंट चवदारतळे महाड ता.महाड याने सोसायटीचे ऑफीसमध्ये जावून ऑफीसचा दरवाजा ढकलून पिडीत क्र.01 हीचे तोंड दाबून तिची फ्रॉक काढायचा प्रयत्न करीत असताना तिची फ्रॉक निघाली नाही त्यावेळी आरोपीत याने स्वताची पॅन्ट खाली करून त्याची त्याने पिडीत क्र.01 व पिडीत क्र 2 त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून पळून गेला.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे गुरनं.35/2025 भा.दं.वि.क.74,75(1)( i),75( 2),76 ,79, बाल लै.अत्या.संरक्षण (POCSO) अधिनियम, 2012 चे कलम 7,8,11(1),12 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मसपोनि/विद्या राउत हे करीत आहेत.

3. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/12/2013 रोजी 00:00 वा ते दि. 25/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान 1)नेरळ रेल्वेस्टेशन जवळ असलेल्या लॉजमध्ये ता.कर्जत 2) फिर्यादी यांचे नावावर असलेल्या रुम नं.501, ओम गणेश कृपा को ऑफ सोसायटी घोरपडे चौक कात्रप बदलापुर पुर्व येथे 3)रुम नंबर 704, ओम दत्त हाईटस पाटील मंगल कार्यालय जवळ मांजर्ली बदलापुर पश्चिम येथील आरोपीत याचे राहते घरी आरोपीत याने त्याचे लग्न झालेले असताना देखील फिर्यादी (पिडीत महीला) हीला मी तुझ्यावर खुप प्रेम करतो मी तुझेशी लग्न करेन असे सतत म्हणुन फिर्यादी हीला प्रेमाच्या जाळयात अडकुन लग्नाचे अमिष दाखवुन वारंवार फिर्यादी हिचे सोबत 1)नेरळ रेल्वेस्टेशन जवळ असलेल्या लॉजमध्ये 2)फिर्यादी यांचे नावावर असलेल्या रुम नं.501, ओम गणेश कृपा को ऑफ सोसायटी घोरपडे चौक कात्रप बदलापुर पुर्व येथे 3)रुम नंबर 704, ओम दत्त हाईटस पाटील मंगल कार्यालया जवळ मांजर्ली बदलापुर पश्चिम येथील त्याचे राहते घरी बोलावुन फिर्यादी यांचेशी वांरवार शारीरीक संबध केले. त्यामुळे फिर्यादी या गर्भवती राहील्याने आरोपीत याने फिर्यादी यांचे संमती नसताना फिर्यादी यांचा गर्भपात करणेस भाग पाडले तसेच आरोपीत याने फिर्यादी यांचे संमतीशिवाय स्वत:चे फायदयाकरीता फिर्यादी यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर कागदपत्रे बनावट तयार करुन फिर्यादी यांनी खरेदी केलेल्या फॅलटवर स्वत:चे को ॲप्लीकंट म्हणुन नाव लावुन फिर्यादी यांची फसवणुक केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.61/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 305 (अ),331(4)115(2),336(2),336(3),351(2),64(2),(m),69,88 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/प्राची पांगे हे करीत आहेत.

4. माथेरान पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/04/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास माथेरान सनसेट पॉइंट येथील नगरपालीकेचे सार्वजनिनक शौचालय च्या रोडवर येथे, येथे कर्जत फिर्यादी रा.वुडलँड बंगलो,सनसेट पॉइंट माथेरान ,ता.कर्जत मुळ रा.समसुददीन चाळ रूम नं.10 ,टागोर नगर विक्रोळी पुर्व मुबंई हया सनसेट पॉइ्ट माथेरान येथील सार्वजनिक शौचालयात जात असताना आरोपी हा पाठीमागे धावत जावून फिर्यादी यांना बघून अश्लिल हावभाव करून फिर्यादी यांना बघून माझी जवानी इंजॉय करतोय असे बोलून फियादी यांच्या मनास लज्जा उत्पन्न होइल असे कृत्य करून विनयभंग केला.

याबाबत माथेरान पोलीस ठाणे गुरनं.03/2025, भारतीय न्याय सहीता कलम 2023 चे 75 ,78 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/गिरी हे करीत आहेत.

5. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 23:50 वा ते दि. 03/04/2025 रोजी 23:50 वा च्या दरम्यान फिर्यादी रा.केंबुर्ली ता.महाड यांच्या घरासमोरील मुंबई गोवा हायवे रोडलगत ता.महाड येथे फिर्यादी यांचे एकूण 45,000/-रुपये किंमतीची मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय स्वत:चे फायदयाकरीता लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेली आहे.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे गुरनं.36/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम

305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/गर्जे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 14.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 175 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,76,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.